**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक१३४४ /२००७**

**१) श्री मोहम्मद आरिफ मो. शब्बीर**
**गुजरी बाजार कामठी, ता. कामठी,**
**जिल्हा नागपूर.**

**अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**३) जन माहिती अधिकारी तथा अति.उप आयुक्त**
**नागपूर महानगर पालिका, नागपूर (स्थावर विभाग)**

**उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १.४.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.८.२००६ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागीतलेली दिसून येते. व सदरची माहीती ही टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

" (१)नागपूर में कुल कितने सार्वजनिक मैदान (स्थल) नागपूर महानगरपालिका के है। (२) उपरोक्त सार्वजनिक मैदान (स्थल) मे से कितने मैदान (स्थल) ऐसे है की जिसे धर्मिक स्थल बना लिया गया है। (३) इन स्थलों के धार्मिक स्थल बनाने के लिऐ क्या इनको महानगरपालिका ने अनुमती दि है। या महाराष्ट्र सरकार से अनुमती मिली है। उनका आवेदन पत्र व अनुमती की झेरॉक्स मिलने हेतू। (४) सार्वजनिक मैदान (स्थल) को धार्मिक स्थल में परिवर्तन करने का कोई प्रावधान है? तो इस की सरकारी कॅापी मिलने हेतू । ऐसे कितने

मैदान(स्थल) नागपूर महानगर पालिका के रिकार्ड में गैरकानुनी धार्मिक स्थल है इन की यादी मिलने हेतूl "

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००६ रोजी खालीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

" उपरोक्त विषयाच्या संबंधात संदर्भिय अर्जानुसार खालीलप्रमाणे माहिती पाठविण्यात येत आहे.

मुद्या क्रं. १ नागपूर महानगरपालिकेला नागपूर सुधार प्रन्यास, हाऊसिंग बोर्ड, नझुल, नगररचना विभागाने मंजूर केलेल्या अभिन्यासातील खुल्या जागा वेळोवेळी हस्तांतरित झालेल्या असून याबाबतची अद्यावत माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. जी माहिती उपलब्ध आहे त्यातील जी माहिती आपणास पाहिजे आहे त्याबाबत निर्धारीत शुल्क जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल.

मुद्या क्रं. २ याबाबतची माहिती विभागात उपलब्ध नाही.

मुद्या क्रं.३ सदर मुद्या नगर रचना विभागाशी संबंधीत असून त्याचे माहिती अधिकारी सहा. संचालक, नगर रचना हे आहेत. तेव्हा याबाबत त्यांच्याकडून माहिती घेता येईल.

मुद्या क्रं.४ सदर मुद्या नगर रचना विभागशी संबंधीत असल्यामुळे संबंधीत विभागाचे माहिती अधिकारी यांचेकडून माहिती घेता येईल.

मुद्या क्रं. ५ याबाबतची माहिती विभागात उपलब्ध नाही. "

४. सदरच्या उपलब्ध माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२००६ रोजी अपीलीय अधिकारी तथा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक ३.१.२००७ रोजी आयुक्त, महानगरपालिका यांनी निर्णय दिलेला असून माहिती प्राप्त झाली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आल्याचे दिसून येते. व त्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे दिसून येते.

५. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक २४.६.२००६ च्या अर्जामध्ये स्पष्टपणे माहितीचे वर्णन दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिनांक ६.१०.२००६ रोजी जे उत्तर देण्यात

आलेले आहे ते उत्तर अर्थातच, माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने नाही. व त्यामुळे मागीतलेली माहिती उपलब्ध आहे व निर्धारित शुल्क जमा केल्यानंतर उपलब्ध करुन देता येईल, हे म्हणणे योग्य दिसत नाही. सदरचे पत्रच मुळात विहित मुदतीत नाही व त्यातूनही उपलब्ध असलेल्या माहितीच्या बध्दल शुल्क दिलेले नाही. सोबत अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखाली असल्याचे रेशन कार्ड जोडलेले आहे. याबाबतचा सुध्दा विचार केला गेलेला दिसत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा कोणत्याही प्रकारे मागीतलेल्या माहितीची छाननी केली नाही. दिलेल्या उत्तराच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे अवलोकन केलेले दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही हा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही.

६. अपीलाच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागीतलेल्या नागपूर मधील मैदानाच्या संदर्भात संपुर्ण अभिलेखे हे महानगरपालिकाकडे नाही. नागपूर सुधार प्रन्यासकडे काही लेआऊटची माहिती आहे. तसेच हाऊसिंग बोर्ड, नझुल यांचेकडे सुध्दा लेआऊट आहे व त्याची संपुर्ण कागदपत्रे महानगरपालिकाकडे उपलब्ध नाही. व एकत्रित असे अभिलेखे कोणत्याही संस्थेकडे उपलब्ध नाही व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. परंतु, नागपूर मधील मैदानाच्या संदर्भामध्ये सर्व्हे करण्यासाठी सुरुवात केलेली आहे व त्यातून काही माहिती त्यांना उपलब्ध होत आहे. परंतु, संपुर्ण मैदानाची माहिती उपलब्ध होऊ शकणार नाही. मात्र, त्याकरीता नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, हाऊसिंग बोर्ड, नझुल व नगररचना विभागांची एकत्रित बैठक घेवून जन नागपूर मधील सर्व मैदानाच्या संदर्भामध्ये प्रत्येक संस्थेकडे असलेली माहिती एकत्रित केल्यास संपुर्ण लेआऊटच्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध होऊ शंकतील व ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येतील. त्याकरीता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (८) अन्वये नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, नागपूर, नझुल विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर व सहाय्यक संचालक, नगर रचना, म.न.पा. नागपूर यांनी एकत्रित येवून सदरची कागदपत्रे महानगरपालिका माहिती अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करुन

माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) आयुक्त, महानगरपालिका, नागपूर, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, महाराष्ट्र गृह निर्माण मंडळ, नागपूर, जिल्हाधिकारी, नागपूर यांनी नागपूर शहरातील मोकळी मैदानांच्या संदर्भात एकत्रित माहिती उपलब्ध करुन देण्याचे करीता पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. उपआयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी जन माहिती अधिकारी, नागपूर महानगरपालिका, जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास, जन माहिती अधिकारी, हाऊसिंग बोर्ड, जन माहिती अधिकारी, नझुल, जिल्हाधिकारी कार्यालय नझुल विभाग, व जन माहिती अधिकारी ,सहाय्यक संचालक, नगर रचना, म.न.पा. नागपूर यांचे कार्यालय यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत एकत्रित बैठक घेऊन अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.८.२००६ च्या अर्जामध्ये मागीतलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अपीलकर्ता यांना सदरच्या बैठकीस उपस्थित राहाण्यास कळवावे.

३) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.८.२००६ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

४) सदरच्या निर्णयाच्या प्रती आयुक्त, महानगरपालिका, नागपूर, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड, नागपूर, जिल्हाधिकारी नागपूर, नझुल विभाग, नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात याव्यात.

५) सदरच्या अपीलाचा निर्णयानुसार व माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करण्यात यावा.

६) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक १.४.२००८**

**(विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**